# सोलापूर विद्यापीठ

कुलसचिव कार्यालय (अभियांत्रिकी विभाग)
सोलापूर पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगाव सोलापूर -४१३२५५
ईपीएबीक्स- ०२१७-२७४४७७८(११ लाईन्स)
विस्तत क्र. १९९
फॅक्स नं. -०२१७-२७४४७७०
संकेत स्थळ:-
http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in
ई- मेल enggsec@sus.ac.in
registrar@sus.ac.in

NACC Accredited -२०१५
-B Grade (CGPA २.६२)

# Solapur University

Registrar Office / (Engg. Section)
Solapur - pune National Highway, Kegaon,
Solapur - 413 255
EPABX No. 0217 - 2744778 (11 Lines)
Ext. No. 199 Fax No. 0217 2744770
Web Site :-
http://su.digitaluniversity.ac/www.sus.ac.in
Email id :- enggsec@sus.ac.in
registrar@sus.ac.in


संदर्भ:- जा.क्र./सोविसो/अभियांत्रिकी विभाग/२०१८-१९/6571 दि. - 3 AUG 2018

**प्रति,**
**मा.प्राचार्य / मा.संस्थाचालक**
सर्व संलग्नित महाविद्यालये,
सोलापूर

**विषय :** महाविद्यालयाच्या दर्शनी भागात संविधान प्रास्ताविका लावणे / स्तंभ उभारणेबाबत.

**संदर्भ :** मा.श्री.शा.भा.पारनाईक,कक्ष अधिकारी महाराष्ट्र शासन यांचे संदर्भ पत्र क्र.संकीर्ण २०१८/प्र.क्र. ५८-२०१८/आस्था-२ दि. ५ मे २०१८ रोजीचे पत्र.

महोदय,

मा.श्री.शा.भा.पारनाईक,कक्ष अधिकारी महाराष्ट्र शासन यांनी श्री.इ.झेड.खोब्रागडे, संस्थापक, संविधान फाऊंडेशन, नागपूर यांच्या दि. १४/११/२०१७ रोजीच्या विनंती पत्राच्या अनुषंगाने अधिनस्त सर्व कार्यालयांच्या दर्शनी भागात संविधान प्रास्ताविका लावणे / स्तंभ उभारणेबाबत कळविलेले आहे.

उपरोक्त संदर्भीय पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आपल्या महाविद्यालयाच्या दर्शनी भागात संविधान प्रास्ताविका लावणे / स्तंभ उभारणेबाबत योग्य ती कार्यवाही करावी.

कळावे.

आपला विश्वासु

(डॉ.जी.आर.मंझा)
कुलसचिव

**सोबत** - संदर्भीय शासन पत्रांची झेरॉक्स प्रत.

महाराष्ट्र शासन

दूरध्वनी क्र.०२२-२२८५५७६६

क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.५८-२०१८/आस्था-२
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
४३१, (विस्तार), ४ था मजला,
मंत्रालय, मुंबई-३२.
दि. ०५ मे, २०१८

प्रति,

संचालक (उच्चशिक्षण / तंत्र शिक्षण / कला /ग्रंथालये), महाराष्ट्र राज्य.
कुलगुरु, सर्व अकृषिक विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.

विषय : शाळा, महाविद्यालये / कार्यालयामध्ये दर्शनी भागात संविधान प्रास्ताविका लावणे / स्तंभ उभारणेबाबत...

उपरोक्त विषयासंदर्भात श्री.इ.झेड.खोब्रागडे, संस्थापक, संविधान फाऊंडेशन, नागपूर यांचे दि.१४/११/२०१७ चे पत्र सोबत जोडले आहे.

सदर पत्रात विनंती केल्यानुसार आपल्या अधिनस्त सर्व कार्यालयांच्या दर्शनी भागात संविधान प्रास्ताविका लावणे / स्तंभ उभारणेबाबत योग्य ती कार्यवाही करावी व संबंधितांस परस्पर कळविण्यात यावे, ही विनंती.

आपला,

सहपत्रे : वरीलप्रमाणे.

(सही)
(शा. भा. पारनाईक)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

Solapur University, Solapur
Establishment Section
Inward No. 117
Date 24 MAY 2018

प्रत

श्री. इ.झेड.खोब्रागडे, ४०२,संस्थापक, संविधान फाऊंडेशन, गिरी गौरव हाऊसिंग सोसायटी, सी-९,अंबाझरी हिल टॉप, रामनगर, नागपूर-४४० ०३३ यांना सामान्य प्रशासन विभागाच्या क्र.जयंती २२५८/ई-ऑफिस २७९९३५८/२९, दि.१६ एप्रिल, २०१८ च्या पत्रास अनुसरुन माहितीसाठी सादर.

SOLAPUR UNIVERSITY, SOLAPUR
REGISTRAR'S OFFICE
Inward No. 117/
Date 23/05/18
Section ESTT Engg

Registrar 22/5/18

Solapur University, Solapur
Office of The Vice-Chancellor
Inward No. 276
Date 22 MAY 2018
Section Registrar

C:\Users\ashish padbiyar\Documents\क्र.CR_58_2018.docx

**Sanvidhan FOUNDATION**
Founder : E.Z.Khobragade, IAS(Retd)
Address : 402, Giri Gaurav Hsg. Society, C-9, Ambazari Hill Top, Ram Nagar, Nagpur - 440 033(Maharashtra)
Email : ez_khobragade@rediffmail.com
Mobile : 09923756900

प्रति
दि. १४ नोव्हेंबर २०१८
नागपूर

मान. श्री देवेन्द्र जी फडणवीस
मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य
मंत्रालय, मुंबई - ३२

विषय :- मंत्रालय परिसरात दर्शनी भागात "संविधान प्रास्ताविका" लावणे / स्तंभ उभारणे बाबत

आदरणीय महोदय,

महाराष्ट्र सरकार २००८ पासून २६ नोव्हेंबर ला संविधान दिवस साजरा करीत आहे. केंद्र सरकारने २०१५ पासून सुरुवात केली. मुळात "संविधान दिवस २६ नोव्हेंबर" ला साजरा करण्याचा उपक्रम नागपूर येथे २००५ ला सुरु झाला. संविधान जागृतीसाठी विविध उपक्रमांचे आयोजन करावे असा आदेश सामान्य प्रशासन व शालेय शिक्षण विभागाने काढला. सर्व शाळा / महाविद्यालये / कार्यालये इत्यादी ठिकाणी भारताच्या "संविधानाची प्रास्ताविका" दर्शनी भागी / मोक्याच्या ठिकाणी प्रदर्शित करण्याचे निर्देश असतांना याकडे शासनाचे / प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. ही गंभीर बाब आहे. संविधानाचा सन्मान करणे हे आपले कर्तव्य आहे.

महोदय, याविषयी आम्ही आपणास वेळोवेळी पत्र पाठवून आठवण करून दिली. तरीही सरकारी यंत्रणेने सरकारच्याच आदेशाची अजूनही पूर्तता केली नाही. ज्या मंत्रालयातून सरकारी आदेश निर्गमित होतात, तेथेच संविधानाची प्रास्ताविका दर्शनी भागी प्रदर्शित करण्यात आली नाही किंवा स्तंभ उभारला गेला नाही. याकडे आपण लक्ष द्यावे ही विनंती आहे.

मंत्रालय परिसरात मोक्याच्या ठिकाणी - दर्शनी भागी संविधान प्रास्ताविका प्रदर्शित केल्यास, संविधान जागृतीच्या उपक्रमास फार मोठे महत्व प्राप्त होईल आणि मंत्रालयातील प्रास्ताविका वाचणारे सरकारचे "लाभार्थी" ठरतील.

आदरपूर्वक

आपला विश्वासू
(सही)
[ इ. झेड. खोब्रागडे ] १४/११/१८

प्रत :- मा. मुख्य सचिव महाराष्ट्र शासन
मंत्रालय, मुंबई - ३२.